अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर
वेबसाईट : www.amc.gov.in
ई-मेल : amc_anr@rediffmail.com
ई-मेल : it.nagar@amc.gov.in
दुरध्वनी क्र: (कार्यालय) ०२४१-२३४३६२२, २३४५१२७,
२३४०५२२, २३४१४५५, २३४६०१०, २३२३०१९
फॅक्स नं.:०२४१ - २३२८८३७

जा.क्र.आस्था.विभाग २८६३ दिनांक १९/०९/२०२४

# - बाजार भावाबाबत कोटेशन दरपत्रक -

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम अधिकारी / कर्मचा-यांना सातवा आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करणेकामी वेतन निश्चिती करणेकरिता दरनिश्चित करणेकामी कोटेशन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १ | १) अहमदनगर महानगरपालिकेमधील दि. ०१/०१/२०१६ पासून आजपर्यत कायम अधिकारी कर्मचारी यांचे मा. शासन निर्णय दि. ०५, सप्टेबर, २०२४ मधील नमूद निर्णयानूसार ७ वा वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे वेतननिश्चिती तक्ते करणे.<br>२) ७ व्या वेतन आयोगानूसार कर्मचा-यांचे दिनांक ०१/०१/२०१६ ते ३१/०८/२०१९ अखेर फरकाचे स्वतंत्र तक्ते तयार करणे.<br>३) ७ व्या वेतन आयोगानूसार कर्मचा-यांचे दिनांक ०१/०९/२०१९ ते ३०/०९/२०२४ अखेर फरकाचे स्वतंत्र तक्ते तयार करणे.<br>४) लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग, आस्थापना विभाग, संगणक विभाग येथील कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगानूसार वेतनश्रेणी, वेतननिश्चिती व अनुषगिक सर्व माहीती देणे व मार्गदर्शन करणे, तसेच ७ व्या वेतन आयोगा संबधी त्रुटी, निराकरण करणे, तसेच वरील नमूद सर्व कामकाजाचे सॉफ्टकॉपी व हॉर्डकॉपी मध्ये सर्व माहिती व फरकाचे तक्ते संगणक विभागास सादर करणे आवश्यक आहे.<br>वरील वेतन निश्चिती तक्ते बाबतचे कामकाज हे दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ अखेर पुर्ण करुन देणे आवश्यक राहील.<br>**टिप :-** वरील कामकाजाचे दर हे प्रति कर्मचारी प्रमाणे नमुद करावे. |

१] रुपये पन्नास हजारपेक्षा जादा रकमेच्या खरेदीस रक्कम रुपये पाचशे फक्तच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा लागेल.

२] PAN (पॅन) क्रमांक असणे आवश्यक आहे. त्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.

३] पुरवठादाराचे देयक फक्त इसीएस/एनईएफटी द्वारेच प्रदान करण्यात येईल. त्यासाठी संबधित पुरवठादाराने कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बॅकेतच खाते असणे बंधनकारक राहील.

तरी वरील कामकाजाकरिता बाजारभाव सिलबंद पाकीटात दिनांक २३/०९/२०२४ रोजी संध्या. ६ वाजेपर्यत महानगरपालिका, नविन प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजी नगर रोड, अहमदनगर येथील आस्थापना विभागामध्ये समक्ष दाखल करावेत.

- दिनांक :१९/०९/२०२४.

**मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेने.**

**उपायुक्त**
अहमदनगर महानगरपालिका

प्रत- मा.आयुक्त तथा प्रशासक, अहमदनगर महानगरपालिका यांना माहितीस सादर.

प्रत- संगणक विभाग प्रमुख, अहमदनगर महानगरपालिका यांस - सदरची जाहिर नोटीस मनपा अधिकृत संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

प्रत- हवालदार,अहमदनगर महानगरपालिका यांस-सदरची जाहिर नोटीस मनपा नोटीस बोर्डावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावी.

D:\ÕÃ99.doc